**मध्य परिमंडळ २**

**-:प्रेस नोट:-** दिनांक ०१/०७/२०२६

**''मंदीरातील दान पोटी चोरणाऱ्या आरोपींना भोईवाडा पोलीस ठाण्यातील गुन्हे प्रकटीकरण पथकाने शिताफीने अटक करुण मालमत्ता हस्तगत केल्या बाबत..''**

दिनांक २८/०६/२०२६ रात्रौ ०९.०० वा ते दि.२९/०६/२०२६ रोजी सकाळी ०६.०० वा चे दरम्यान 'व्याघ्रेश्वर महादेव मंदीर, सदानंद जाधव मार्ग, नायगाव, दादर-पुर्व, मुंबई' या मंदीरातील दोन दान पेटया व त्यामधील दान केलेली रक्कम अशी एकुण ९,०००/- ची संपुर्ण मालमत्ता चोरीस गेल्याने मंदिर पुजारी यांनी अनोळखी आरोपीविरोधात तक्रार दिल्याने भोईवाडा पोलीस ठाणे, गु.र.क्र.२४२/२०२६ कलम ३३२ब, ३३१(४), ३(५) भारतीय न्याय संहिता अन्वये गुन्हा नोंद करण्यात आला आहे.

सदरचा गुन्हा हा संवेदेनशिल स्वरूपाचा असल्याने मा. वरिष्ठांच्या मार्गदर्शनाखाली विशेष शोध पथक तयार करण्यात आले. सदर आरोपीचा तांत्रिक कौशल्याचा आधारे शोध घेवून ३ आरोपींना ताब्यात घेण्यात आले.

१. रोहित मल्लेश खंडागळे,२१ वर्षे, काम-गाडी धुणे, राठि.रु.नं.३७, बारादेवी शाळा, आचार्य दोंदे मार्ग, शिवडी मुंबई-१५
२. आदित्य रमेश प्रसाद,२२ वर्ष, काम- केटरिंग, राठि.रु.नं.४२४, एकविरा मंदीर,घोडा तबेला, ॲन्टॉपहिल चर्च, मुं-३७ मो
३. साहिल शेख उर्फ मांडवा, बंगालीपुरा, ॲन्टॉपहिल, मुंबई

नमुद आरोपींकडे कसुन चौकशी करुन, गुन्हयातील मालमत्ता दोन दान पेटया व त्यामधील दान केलेली रक्कम अशी एकुण ९,०००/- ची संपुर्ण मालमत्ता हस्तगत करण्यात आली आहे.

सदरची कामगीरी मा.पोलीस आयुक्त, श्री देवेन भारती, मा.पोलीस सह आयुक्त, (कायदा व सुव्यवस्था) श्री मनोजकुमार शर्मा, मा.पोलीस सह आयुक्त,(गुन्हे) श्री अनिल कुंभारे , मा.अपर पोलीस आयुक्त, मध्य प्रादेशिक विभाग, मुंबई, श्री विक्रम देशमाने, मा.पोलीस उप आयुक्त, मध्य परिमंडळ-२, मुंबई, श्री अनुराग जैन, मा.सहाय्यक पोलीस आयुक्त, भोईवाडा विभाग, मुंबई, श्रीमती माधुरी पाटील यांच्या मार्गदर्शना खाली भोईवाडा पोलीस ठाण्यातील वरिष्ठ पोलीस निरीक्षक श्री कैलास आव्हाड व पो.नि.(गुन्हे) श्री नितीन महाडीक, तपासी अधिकारी मपोउनि.सोनाली निमसे, पो.ह.क्र.९७०४९१/चव्हाण, पो.ह.क्र.१५७२/खेडेकर, पो.ह.क्र.०८०६०६/राठोड, पो.शि.क्र.११७०४/सुतार व पो.शि.क्र.१४१९२५/जोशी यांनी आरोपींना शिताफीने अटक करुन गुन्हयातील संपुर्ण मालमत्ता हस्तगत करून उत्कृष्ठ कामगिरी बजावली आहे.